# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 27 / 2024 दिनांक : 17.01.2024

## 1)जबरी चोरी :–

**विमानतळ** :–दिनांक 15.01.2024 रोजी चे 22.45 वा. चे सुमारास, **नमस्कार चौक ते एमजीएम कॉलजकडे जाणारे रोडवर ब्रम्हामसिंगनगर कमानी समोर नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून मोटार सायकलवर येवुन फिर्यादीचे खिशातील ओपो 155 कंपणीचा मोबाईल किंमती 16,000 / –रू चा व खिशातील नगदी 500 / –रू असा एकुण 16,500 / –रू चा मुद्येमाल जबरीने हिसकावुन घेवुन पळुन गेले. सदर गुन्हयातील तीन आरोपीतांना कांही तांसातच अटक करून चोरीस गेलेला मुद्येमाल हस्तग करून गुन्हा उघडकीस आणला आहे. सदर आरोपीना मा. न्यायालयाने एक दिवसाची पीसीआर दिलेली आहे. 1)शशीकांत सखाराम भडगळ, वय 23 वर्षे, रा. कर्मविरनगर नांदेड, 2) संतोष उर्फ मारी पि. पमरेश्वर तेलंग, वय 26 वर्षे, रा. गुरूनगर नांदेड, 3)करण देविदास राठोड, वय 20 वर्षे, रा. बजरंग कॉलनी नांदेड यास सपोनि विजय जाधव यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पोहेकॉ दारासिंग राठोड, सपोउपनि चंद्रकांत पांचाळ, पोहेकॉ सदाशिव आव्हाड, पोकॉ ज्ञानेश्वर भिसे, पुडलीक कुरूपवाड, चापोउपनि भोसीकर साहेब यांनी कामगीरी केली आहे. वगैरे **फिर्यादी आकाश हाणमंत रामशेटवाड, वय 24 वर्षे, व्यवसाय खाजगी काम नाथनगर गणपती मंदीराजवळ नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 12 / 2024 कलम 392, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / श्री नागोराव जाधव मो. नं.8007580146,** हे करीत आहेत.

## 2)मो.सा.चोरी :–

**शिवाजीनगर** :– दिनांक 13.01.2024 रोजी चे 08.00 ते 08.30 वा. चे दरम्यान, **जिल्हा कृषी कार्यालय समोर नवा मोंढा नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो स्पलेंडर कंपणीची मोटार सायकल क्रं. एम.एच.–26 / एपी–1494 किंमती 45,000 / –रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी आनंदराव मारोती तिडके, वय 49 वर्षे, व्यवसाय शेती रा. देगांव ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 21 / 2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 1130 गुंटलवाड, मो.क्रं. 7744071130** हे करीत आहेत.

## 3)चोरी :–

**धर्माबाद** :– दिनांक 15.01.2024 रोजी चे 11.50 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घराचे वरांडयात फुलेनगर ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात आरोपी हा फिर्यादीचे घराचे गेट काढुन वरांडयात येवुन तुळशीचे झाड, देवदेवतांचे फोटो फेकुन दिला. फिर्यादीचे मुलांची ॲटलस कंपणीची सायकल जुनी वापरती किंमती 1500 / –रू ची व दोन नवीन पाण्याची मोटारी किर्लोस्कर कंपणीची किंमती 10,000 / –रू च्या व नळ फिटींगचे सामान किंमती 5000 / –रूपयाचे असे एकुण 16,500 / –रूपयाचे मालाची चोरी करून घेवुन गेला. वगैरे **फिर्यादी जनाबाई गणेश राजुरवार, वय 35 वर्षे व्यवसाय घरकाम रा. फुलेनगर धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 08 / 2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि / कारामुंगे, मो.क्रं. 9823063428** हे करीत आहेत.

## 4)मोबाईल चोरी :–

**अर्धापुर** :– दिनांक 13.01.2024 रोजी चे रात्री 12.30 वा. चे सुमारास, **भोकर फाटा ते बारड जाणारे रोडवर कलदगाव पाटी जवळ ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे त्यांचे वेटरचे काम संपवुन मोटार सायकलने घराकडे शेंबोली येथे जात असतांना त्याला लघवी आल्याने मोटार सायकल रस्त्याचे कडेला लावुन लघवी करण्यासाठी रोडच्या खाली गेले असता मोटार सायकलला लटकवुन ठेवलेली कॅरीबॅग ज्यामध्ये सॅमसंग कंपणीचा मोबाईल किंमती 10,000 / –रू चा जुना वापरता व नगदी 2000 / –रूपये असा एकुण 12,000 / –रू चा मुद्येमाल अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी रऊफखान पी. शेरबाजखान पठाण, वय 45 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. शेंबोली ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 15 / 2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 631 देशमुख, मो.क्रं. 9923647631** हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :–

**इतवारा :–**दिनांक 12.01.2024 रोजी चे 19.30 वा. चे सुमारास, **श्री अग्रवाल किराणा दुकाना समोर रोड लगत जुनामोंढा नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने तु माझे पत्नी सोबत अनैतीक संबध का ठेवले या कारणावरून शिवीगाळ केली व हातातील धारदार लोखंडी कटरने व हातातील कडयाने गळयावर, डोक्याला मारून गंभीर दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी सोनुसिंह पि. कुंजीलालसिंह परमार, वय 65 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. बसवेश्वरनगर जुना कवठा नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरन 08/2024 कलम 326, 324, 504, 506, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1982 सरोदे, मो.नं. 02462–236510** हे करीत आहेत.

## 6)प्राण्यास क्रुरतेने वागणुक :–

**उमरी :–**दिनांक 15.01.2024 रोजी चे 19.30 वा. चे सुमारास, **मौ. उमरी ते भोकर जाणारे रोडवर ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून आपले ताब्यातील आयचर कंपणीचे 6 टायरी वाहन क्रमांक टीएस–08/युई–6840 मध्ये 16 म्हशी, 03 हलगट दाटी वाटी कोंबुन, पायास बांधुन क्रुरपणे इजा होईल अशा पध्दतीने वाहतुक करीत असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/2852 माधव प्रकाशराव पवार, ने. पोस्टे उमरी** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरन 30/2024 कलम 6 महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा अधिनियम, सह कलम 11(1)(ड),11(1)(ई) प्राण्याचा छळ प्रतिबंध अधिनियम 1960 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2354 गेडाम, मो. नं. 9421768528** हे करीत आहेत.

## 7)जुगार :–

**कुंडलवाडी :–**दिनांक 15.01.2024 रोजी चे 17.50 वा. चे सुमारास, **बामणी ते सिरकोडकडे जाणारे रोडवर गोदावरीच्या पुलाजवळ बामणी शिवार ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी व पळुन गेलेले दहा ते पंधरा जण यांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या गोलाकार बसुन झन्ना मन्ना नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 12,580/–रूपये व 11 मोटार सायकली किंमत अंदाजे 5,50,000/–रू असा एकुण 5,62,580/–रू चा मुद्देमाल व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/1876 रघुवीर विठ्ठलसिंह चौहान, ने. पोस्टे कुंडलवाडी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंडलवाडी** गुरनं 06/2024 कलम 12(अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/नारायण शिंदे, मो.नं. 9767411279** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड